॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon


## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ६ (प्रतिनिधी) : कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळा शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने दिव्यांग व्यक्ती या विषयाच्या प्रात्यक्षिक कार्याचा भाग म्हणून विद्यार्थ्यांनी "दीपस्तंभ फाउंडेशन संचालित मनोबल" या विशेष शाळेला दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी शैक्षणिक भेट दिली.

शिक्षणशास्त्र विभागप्रमुख डॉ. मनीषा इंदाणी यांच्या संकल्पनेतून मागील ५ वर्षापासून हा उपक्रम राबविला जात आहे. दिव्यांगजन, तृतीयपंथी, अनाथ हे समाजाचा अविभाज्य घटक असून त्याविषयी फक्त सहानुभूती न बाळगता त्याच्या अडचणीची जाणीव व्हावी हा या भेटी मागचा उद्देश असतो. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी विशेष गरजा असलेल्या मुलांच्या शिक्षणपद्धतीचा सखोल अभ्यास केला. संस्थेची कार्यपद्धती, अध्यापन तंत्र आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात येणारे उपक्रम यांची सखोल माहिती श्री. सात्वीक मुरुमकर यांनी दिली. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी विशेष शाळेची वर्गव्यवस्था, वैयक्तिक अध्यापन पद्धती तसेच विविध थेरपी सुविधा यांचे निरीक्षण केले. याशिवाय विद्यार्थ्यांनी विशेष मुलांशी आणि शिक्षकांशी संवाद साधून त्यांच्या दैनंदिन जीवनातील आव्हाने आणि प्रगती समजून घेतली.

दीपस्तंभ फाउंडेशन संस्थेचे प्रकल्प प्रमुख आर. डी. पाटील. शैक्षणिक प्रमुख सौ. योगिता महाजन, जनसंपर्क अधिकारी सौ. उमा सूर्यवंशी, याच्या समन्वयातून आणि सहकार्याने ही भेट संपन्न झाली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष मुलांबद्दल संवेदनशीलता निर्माण झाली. तसेच दिव्यांगांविषयी विषयाचे व्यावहारिक ज्ञान मिळाले. मनोबल विशेष शाळेचे कार्य समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी असून अशा संस्थांना अधिक पाठिंबा मिळण्याची गरज असल्याचे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

सदर प्रात्यक्षिक कार्यासाठी विद्यार्थ्यांना डॉ संतोष खिराडे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. रणजीत पारधे, डॉ स्वाती तायडे यांचेसह द्वितीय वर्षातील विद्यार्थी यांनी सहभाग नोदविला. या उपक्रमासाठी श्री. संदीप वाघ, योगेश कोरडेवाड जयेश पाटील, विवेक भावसार यांनी परिश्रम घेतले.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ६ एप्रिल, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता